
# असा आहे मका



'मका' हा मुळचा अमेरिकेतील, तेथून तो जगभर पसरला. यात महत्वाचे समघटक असल्याने मानव व पाळीव प्राणी यांचे अन्नात मक्याला महत्वाचे स्थान प्राप्त झाले. लाह्या, भाजलेली कणसे, दाण्यांची उसळ, पिठाच्या भाकरी व थालीपिठे लहान मुलांसाठी औषध (सिरप), मधुनिर्मिती, साबण, रंग यांचे उत्पादन यातही मका वापरला जातो. मक्याची पाने व धाटे जनावरे आवडीने खातात. मक्यात परपरागीकरण होते त्यानंतर फळे व त्यात बी बनते. साधारण ५००० वर्षापूर्वीपासूनचा मक्याचा इतिहास ज्ञात आहे. त्या पूर्वीचा नाही. मक्याबरोबरच 'टीओसिटे' नामक गवत आढळते किंबहुना या गवताच्या जातीचे रुपांतरच नंतर मका या सध्याच्या प्रजातीत झाले असावे असा शास्त्रज्ञांचा कयास आहे. या दोघांच्या रंग सुत्रात (क्रोमोझोममध्ये) साम्य ते आढळते. परंतु काही वनस्पती शास्त्रज्ञांना ही उत्पत्ती मान्य नाही. मूळ त्यामुळे अज्ञातच आहे.

मुळचा रानटी मक्याचा अपघातानेच उष्णतेशी संबंध आल्यावर मक्याची अन्न या दृष्टीने उपयुक्तता आदिमानवाला दिसून आली असावी, मात्र एकूणच मध्य अमेरिका हेच मक्याचे आदिस्थान असावे असे सकृतदर्शनी आढळते.

मक्यावर खूप सखोल संशोधन झालेले असून त्याच्या पूर्वज परंपरे संबंधीचे ज्ञान इतर कोणत्याही धान्यापेक्षा अधिक आहे. तरीही त्याचे मूळ अज्ञात रहावे ही नवलाची बाब आहे. मक्याचा आधुनिक इतिहास मात्र खूप काळजीपूर्वक नोंदवून ठेवला गेला आहे. गेल्या काही दशकांत वनस्पतींच्या प्रजननात शास्त्रज्ञांना जे अपूर्ण यश लाभले आहे, ते बहुतांशी मक्याच्या बाबतीत आहे. यामुळे अमेरिकेत कृषी क्रांती झाली असून तिचा जगाच्या इतर भागात प्रसार होत आहे.

परपरागणामुळे मक्याचे सर्वच प्रकार संकरण आहेत. आज लागवडीत असलेला मक्याचा संकरण विशेष प्रयत्नांनी व प्रकारांनी बनविलेला 'द्विसंकरण' प्रकार असून त्यामध्ये विशेष प्रकारचे ओज असून अनेक मानवोपयोगी गुणधर्म नव्याने समाविष्ट केले आहेत. यात शास्ज्ञांनी सृष्टिकर्त्यावर मात केली आहे, असे म्हणण्यात अतिशयोक्ति होणार नाही. प्रजननाच्या तंत्राचा उपयोग करून आता कांदा, मिलो, जोधळा, गहू, बीट व कोंबड्या इत्यादींचे 'द्विसंकरण' मिळाले आहेत.

सृष्टिवर विजय मिळविण्याचे मानवाचे स्वप्न अधिकाधिक साकार होत आहे.

संदर्भ – Plants and Civilisation
पुस्तक लेखक – एच. जी. बेकर

◆

**प्रा. शं. आ. परांडेकर**